देवतांची उपासना : श्री गणपति – खंड १

# श्री गणपति

मराठी (Marathi)

**संकलक**

हिंदु राष्ट्र-स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**


**पू. संदीप गजानन आळशी**

**सनातन संस्था**

एप्रिल २०२३ पर्यंत सनातनच्या ३६० ग्रंथांच्या मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, कन्नड, तमिळ, तेलुगु, मल्ल्याळम्, बंगाली, ओडिया, आसामी, गुरुमुखी, सर्बियन, जर्मन, स्पॅनिश, फ्रेंच आणि नेपाळी या १७ भाषांत ९३ लाख ३९ सहस्र प्रती !

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ 'सनातन संस्थे'ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून २०.४.२०२३ पर्यंत १२३ साधक संत झाले, तर १,०८९ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक 'सनातन प्रभात'चे संस्थापक-संपादक

५. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. 'हिंदु राष्ट्रा'च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना दिशादर्शन !

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसा असू सर्वदा सर्वां ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## ग्रंथाची अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | व्युत्पत्ती आणि अर्थ | १५ |
| २. | काही इतर नावे आणि त्यांचा अर्थ | १५ |
| ३. | महागणपति | २० |
| ४. | व्याप्ती | २१ |
| ५. | महत्त्व | २१ |
| ६. | कार्य आणि वैशिष्ट्ये | २१ |
| ७. | युगानुसार अवतार | २५ |
| ८. | परिवार आणि त्याचा भावार्थ | २६ |
| ९. | सनातन-निर्मित श्री गणपतीचे सात्त्विक 'चित्र' अन् 'नाम-पट्टी' | २७ |
| १०. | मूर्तीविज्ञान | ३४ |
| ११. | भूतलावरील स्थाने (स्वयंभू गणपती) अन् भारतातील प्रसिद्ध गणपती | ४५ |
| १२. | उपासना | ४७ |
| १३. | संप्रदाय आणि काही थोर गणेशभक्त | ९९ |

१४. श्री गणपति आणि इतर १०१

१५. श्री गणपतीच्या संदर्भातील अनुभूती १०२

१६. सार्वजनिक श्री गणेशोत्सव : कसा नसावा अन् कसा असावा ? १०३

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ११०

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या ‘सच्चिदानंद परब्रह्म’ या उपाधीविषयी विवेचन !

‘१३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये ‘प.पू.’ आणि ‘परात्पर गुरु’ या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

## सनातनच्या दोन सद्गुरूंच्या नावांच्या आधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

नाडीपट्टी–वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ’ असे संबोधले जात आहे. या संतद्वयी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत.

## वाचकांना निवेदन !

‘या ग्रंथात सूक्ष्म परीक्षण, सूक्ष्म ज्ञानाविषयीची चित्रे, तसेच ‘पी.आय.पी.’(पॉलीकॉन्ट्रास्ट इंटरफेरन्स फोटोग्राफी)’ तंत्रज्ञानाच्या साहाय्याने केलेली वैज्ञानिक चाचणी ‘महर्षि अध्यात्म विश्वविद्यालया’च्या सौजन्याने घेतले आहे.’ – **प्रकाशक**

# ग्रंथाचे मनोगत

एखाद्या देवतेविषयी आपल्याला अध्यात्मशास्त्रीय ज्ञान (माहिती) कळले, तर त्या देवतेसंबंधी आपली श्रद्धा अधिक वाढायला साहाय्य होते. श्रद्धेमुळे साहजिकच उपासना भावपूर्ण व्हायला साहाय्य होते आणि भावपूर्ण उपासना ही अधिक फलदायी असते. या दृष्टीने या ग्रंथात श्री गणपतीसंबंधीचे सर्वसाधारणतः इतरत्र कोठेही न आढळणारे; पण उपयुक्त असे अध्यात्मशास्त्रीय ज्ञान (माहिती) देण्यावर भर दिला आहे.

श्री गणपतीच्या प्रमुख नावांचा भावार्थ; देवांची प्रकाशभाषा आणि मानवाची नादभाषा यांचे एकमेकांत रूपांतर करणारा, प्राणशक्ती वाढवणारा इत्यादी गणपतीची कार्ये अन् वैशिष्ट्ये; उजव्या आणि डाव्या सोंडेच्या गणपतीचे महत्त्व; गणपतीला दूर्वा आणि लाल फुले का वहातात; दूर्वांची लांबी, संख्या आणि अर्पण करण्याची पद्धत; चतुर्थी अन् चंद्र यांचा संबंध; तसेच सार्वजनिक गणेशोत्सवाचे सध्याचे विदारक स्वरूप पहाता 'तो कसा नसावा आणि कसा असावा' इत्यादींचे विवेचन या ग्रंथात थोडक्यात केले आहे.

श्री गणपतीविषयीचे हे अध्यात्मशास्त्रीय ज्ञान गणेशभक्तांना आणि गणपतीची सांप्रदायिक साधना करणाऱ्यांना निश्चितच उपयुक्त ठरेल; परंतु सर्वसाधारण व्यक्तीने या संदर्भात पुढील नियम लक्षात ठेवावा. रामायण वाचल्यावर श्रीरामाची, गणेशपुराण किंवा श्री गणपति अथर्वशीर्ष वाचल्यावर श्री गणपतीची आणि देवीमाहात्म्य वाचल्यावर देवीची उपासना करावी, असे काही जणांना वाटते. त्याचप्रमाणे या ग्रंथातील ज्ञान वाचून 'आपणही श्री गणपतीची उपासना करावी', असे काही जणांना वाटण्याची शक्यता आहे. अशा व्यक्तींनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, अशा प्रकारच्या उपासनेने सर्वांचीच आध्यात्मिक उन्नती शीघ्र होत नाही; कारण गणपति

इत्यादींची उपासना करणे त्यांना आवश्यक असले, तरच त्या उपासनेचा जास्त लाभ होतो, नाहीतर भरपूर काळ साधना करूनही फारच थोडी प्रगती होते. 'गणपतीची उपासना ही पुढच्या टप्प्याची उपासना आहे अन् ती करणे आवश्यक आहे कि नाही', हे सर्वसाधारण व्यक्तीला कळत नाही, तर अध्यात्मदृष्ट्या उन्नत असलेलेच ते सांगू शकतात; म्हणून सर्वसाधारण व्यक्तीने केवळ ज्ञान म्हणूनच हा ग्रंथ वाचावा. साधनेसंबंधी अनुभूती येण्याच्या दृष्टीने साधनेचा पहिला टप्पा म्हणून आपल्या कुलदेवतेच्या नावाचा 'श्री... (कुलदेवी / कुलदेव यांच्या नावाचा चतुर्थीचा प्रत्यय)... नमः ।' या पद्धतीने (उदा. कुलदेवी श्री भवानीदेवी असल्यास 'श्री भवानीदैव्यै नमः ।' याप्रमाणे) नामजप करावा. पुढे गुरूंनी गणपतीचा नामजप करण्यास सांगितले, तर त्या वेळी या ज्ञानाचा उपयोग गणपतीवरील श्रद्धा वाढण्यासाठी होईल. इतरांना या ग्रंथातील ज्ञान वाचून 'गणपतीविषयी काहीतरी नवीन कळले', असे जाणवेल.

हा ग्रंथ वाचून गणपतीच्या उपासकांची गणपतीवरील श्रद्धा दृढ होवो आणि त्यांना अधिक साधना करण्याची प्रेरणा मिळो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

(श्री गणपति ही देवता आणि त्याची उपासना करण्याच्या संदर्भातील प्रत्येक गोष्टीचे बुद्धीपलीकडील शास्त्रीय कारणमीमांसा करणारे 'न भूतो न भविष्यति' असे ज्ञान सनातनच्या श्री गणपतीविषयी सखोल अध्यात्मशास्त्रीय ज्ञान असलेल्या ग्रंथांमध्ये दिले आहे.)

**श्री गणेश उपासना करण्यास शिकवणारा सनातनचा लघुग्रंथ !**



**श्री गणपति अथर्वशीर्ष अन् संकष्टनाशनस्तोत्र**

श्री गणेशस्तोत्राचे पठण केल्याने स्मरणशक्ती वाढते अन् शरिराभोवती सूक्ष्म संरक्षक-कवच निर्माण होते. यासाठी नित्य गणेशस्तोत्राचे पठण करा आणि मुलांकडूनही करवून घ्या !